वाचा :— १. विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक : जगन्या १४१९/५/प्र. क्र. ४/ का—नउ दिनांक ०४ मार्च, २०२०.

२. विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक : जगन्या १४१९/५/प्र. क्र. ४/ का—नउ दिनांक २९ जून, २०२१.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण—२७१५/प्र. क्र. १००/१३ दिनांक १७ डिसेंबर, २०१६

---

## जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

## परिपत्रक

जालना येथे एक POCSO न्यायालय व विशेष जलद गती न्यायालय दिनांक २२/०७/२०२० पासून कार्यान्वित झालेले असून सदर न्यायालयात एक वर्षासाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या कर्मचा—यांची मुदत संपत आलेली असल्यामुळे सदर न्यायालयाच्या आस्थापनेवर सेवानिवृत्त कर्मचा—यांची पुढील एक वर्षासाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करावयाची आहे.

सदरील न्यायालयासाठी लघुलेखक उच्चश्रेणी (लघुलेखक ग्रेड—१)— १ पद, अधिक्षक—१ पद, वरिष्ठ लिपिक—१ पद, कनिष्ठ लिपिक—२ पदे आणि शिपाई—२ पदे या पदावर कंत्राटी पध्दतीने काम करण्यास ईच्छुक असलेल्या त्या—त्या संवर्गातील कर्मचा—यांनी सदर न्यायालयात कंत्राटी पध्दतीने एक वर्षासाठी काम करण्यास ईच्छुक असल्याबाबतचे सोबतच्या नमुन्यात संबंधीताचे संमती अर्ज दिनांक १६/०७/२०२१ पर्यंत मागविण्यात येत आहे.

सदरील न्यायालयासाठी सेवानिवृत्त कर्मचा—याची निवड करतांनी संदर्भात नमुद शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

संमती अर्ज या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर सदर आस्थापनेवर विहित प्रक्रिया पार पाडुन त्या संदर्भात नमुद शासन निर्णयात नमुद निकषात बसणा—या व सेवा निवृत्ती पुर्वीच्या कालावधीतील अभिलेखाचे अवलोकन करून सुयोग्य कर्मचा—यांना सदर आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने एक वर्षासाठी नियुक्ती देण्याबाबत सल्लागार समिती निर्णय घेईल. संमती अर्ज दिल्यावर संदर्भीय आस्थापनेवर नियुक्ती होईलच असे नाही.

विहित कालावधी नंतर आलेले संमती अर्ज विचारात घेतले जाणार नाही. वेतनाबाबत शासन निर्णयात नमुद अटी व शर्ती लागु राहतील.

प्रस्तुत परिपत्रक जालना न्यायीक जिल्हयाच्या प्रत्येक आस्थापनेवरून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा—यांच्या नजरेस आणुन द्यावे.

| | | |
|---|---|---|
| जिल्हा व सत्र न्यायालय | {} | (श्रीमती एस. के. केवले) |
| | {} | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, |
| जालना. दिनांक :— १३/०७/२०२१ | {} | जालना |

जा.क्र.आस्था/3435/२०२१
दिनांक:— १३/०७/२०२१

प्रतिलिपी /—

१ अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश (पोक्सो न्यायालय) जालना
२. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, जालना.
३. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.
४. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना.
५. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, परतुर / बदनापुर / भोकरदन / मंठा/ घनासावंगी / जाफ्राबाद.
६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, अंबड.
७. प्रबंधक जिल्हा न्यायालय, जालना.
८. नोटीस बोर्ड, जिल्हा न्यायालय, जालना.

| | | |
|---|---|---|
| जिल्हा व सत्र न्यायालय | {} | (श्रीमती एस. के. केवले) |
| | {} | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, |
| जालना. दिनांक :— १३/०७/२०२१ | {} | जालना |

<u>**जिल्हा व सत्र न्यायालय, जालना.**</u>

जालना येथील प्रस्तावित प्रत्येकी एक POCSO न्यायालय व विशेष जलद गती न्यायालयाच्या आस्थापनेवर काम करण्यास इच्छुक असलेल्या सेवानिवृत्त कर्मचा—यांनी द्यावयाचा लेखी संमती अर्ज.

# प्रपत्र

| अ.क्र. | विवरण | | माहिती |
|---|---|---|---|
| 1 | कर्मचा—याचे नांव | : | |
| 2 | ज्या पदावरून सेवानिवृत्त झाले ती दिनांक | : | |
| 3 | सेवानिवृत्त नियत वयोमानानुसार किंवा स्वेच्छा सेवानिवृत्त झाले. | : | |
| 4 | सेवानिवृत्तीच्या पदावर अथवा त्या खालील पदावर इच्छुक असलेल्या पदाचे पदनाम | : | |
| 5 | सेवा प्रवेशाचा दिनांक | : | |
| 6 | सेवा निवृत्तीचा दिनांक | : | |
| 7 | सेवेत असतांनी काम केलेल्या विविध विभागांची नांवे | : | |
| 8 | सेवा काळात विभागीय चौकशी झाली असल्यास त्याचा तपशिल (निकाला सह) | : | |

मी अर्जदार अंगिकारपत्र लिहून देतो की, प्रस्तावित POCSO न्यायालय किंवा विशेष जलद गती न्यायालयाच्या आस्थापनेवर माझी नेमणुक झाल्यास मा. उच्च न्यायालयाने आणि शासन निर्णय क्रमांक : जगन्या १४१९/५/प्र. क्र. ४/ का—नउ दिनांक ०४ मार्च, २०२० व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण—२७१५/प्र.क्र. १००/१३ दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मध्ये नमुद सदर आस्थापनेवर सेवेसंदर्भात केलेले निर्देश व नियमावली मला बंधनकारक राहतील. माझा विकल्प अंतिम असुन दिलेला विकल्प मी रद्द करणार नाही. दिलेल्या विकल्पानुसार माझी सदर आस्थापनेवर नियुक्ती मागण्याचा मला हक्क राहणार नाही. मी दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व कार्यालयीन अभिलेखा प्रमाणे बरोबर व खरी असून यात काहीही त्रुटी आढळल्यास त्यास मी स्वत: जबाबदार राहील.

दिनांक :

अर्जदार

सही ——————————

नांव व पत्ता ——————————

मोबाईल क्रमांक ——————————